Exh. 01/B

दि. किर.अर्ज नं.     /२०२६

# मे. सिव्हील जज्ज सिनिअर डिव्हीजन, इचलकरंजी

## यांचे कोर्टात.....

| | |
|---|---|
| रोहीतकुमार अ‍ॅण्ड कंपनी<br>प्रोप्रा. श्री.जगदीशप्रकाश जुगलकिशोर करवा(HUF)<br>व.व.५६, धंदा - व्यापार, रा.५/५९५, वेद भवन<br>दाते मळा, इचलकरंजी, ता.हातकणंगले, जि.कोल्हापूर | अर्जदार<br>(मुळ प्रतिवादी) |

विरुध्द

| | |
|---|---|
| नवल विविंग वर्क्स तर्फे<br>प्रोप्रा. नवलकिशोर रामरतन खटोड<br>व.व.५२, धंदा - व्यापार,<br>रा.५/३३८, खटोड सदन, कागवाडे मळा,<br>इचलकरंजी, ता.हातकणंगले, जि.कोल्हापूर | वि.प.<br>(मुळ वादी) |

रु. ५/- कोर्ट फी स्टँप

**दिवाणी प्रक्रिया संहिता ऑर्डर ३७ रुल ४ प्रमाणे समरी दिवाणी दावा नं.१६/२०२४ चा दावा पुन्हा फैलावर घेणेबाबतचा अर्ज**

**यातील अर्जदार तर्फे विनंती अर्ज असा की,**

ORDER
Issue notice to the opponent on P.F.
R/o. 24/02/2026

Sd/-
4th C.J.J.D., Ichalkaranji

१. यातील वि.प. यांनी अर्जदार यांचे विरुध्द मे.सिव्हील जज्ज वरीष्ठ स्तर, इचलकरंजी (४ थे सह दिवाणी न्यायाधिश, कनिष्ठ स्तर, इचलकरंजी) यांचे न्यायालयात दिवाणी प्रक्रिया संहिता ऑर्डर ३७ प्रमाणे रक्कम वसुलीचा समरी दिवाणी केस नं.१६/२०२४ चा दावा दाखल केला होता.

२. सदर मुळ समरी केस नं.१६/२०२४ मध्ये प्रथम ता.२२/०७/२०२४ इ. समन्स गैरलागु झाले होते. त्यानंतर शेवटी वि.प. यांनी ता.२८/०३/२०२५ इ. अर्जदार यांचे विरुध्द मुळ दावेचे समन्स दिवाणी प्रक्रिया संहिता ऑर्डर ५ रुल २० प्रमाणे चिकटवुन लागु करणे संदर्भात अर्ज दिला व तो अर्ज मंजुर झालेनंतर अर्जदार यांना सदर दावेचे समन्स लागु केलेचे रिपोर्ट सदर समरी

21.1.26
Superintendent
Civil C... Dn.

दावेत झालेचे दिसते. त्यानंतर समन्स लागु झालेपासुन १० दिवसाचे आत अर्जदार हे मा.कोर्टात हजर न राहिलेने त्यांचे विरुध्द दि.१४/०७/२०२५ इ. रोजी मा.४ थे सह दिवाणी न्यायाधिशसो, कनिष्ठ स्तर, इचलकरंजी यांचे कोर्टाकडून एकतर्फा हुकूमनामा वि.प. यांनी मिळविला आहे.

३. समरी दिवाणी दावा नं. १६/२०२४ मध्ये अर्जदार यांना कधीही वैयक्तिक अगर त्यांचे कुटूंबातील कोणत्याही व्यक्तीस समन्स लागु झालेले नाही. तथाकथित समन्स लागु केलेचा बेलीफ यांचा ता.१०/०६/२०२५इ. चा रिपोर्ट हा वस्तुस्थितीप्रमाणे नाही. मुळातच अर्जदार यांना समरी दिवाणी दावा नं.१६/२०२४ चे समन्स यथायोग्य व वैयक्तिकरित्या लागु झाले नसलेने अर्जदार यांना दहा दिवसाचे आत वकीलांचेमार्फत मा.कोर्टात हजर राहता आले नाही.

४. समरी दिवाणी दावा क्रं. १६/२०२४ मध्ये नमुद केलेली दावा रक्कम रु.१,४१,२६९/- अगर रक्कम रु.१,०९,२२९/- ही तथाकथित रक्कम अर्जदार हे वि.प. यांना कधीही देणे लागत नव्हते व नाही. उलट वि.प. यांचेकडे अर्जदार यांचा बऱ्याच मोठ्या रक्कमेचा सुतमाल व कापडमाल शिल्लक आहे व तो व्यवहार संपुष्टात आला नसलेने व त्याबाबत अर्जदार व वि.प. यांचेत वाटाघाटी चालु असलेने त्याचा गैरफायदा घेवुन वि.प. यांनी अर्जदार यांचेविरुध्द परस्पर दावा दाखल केलेचे अर्जदार यांना समजुन आले नव्हते व नाही. रेग्युलर दर.नं.४६/२०२५ ची नोटीस लागु झालेनंतर अर्जदार यांना त्याची माहिती समजली. अशास्थितीत अर्जदार यांना समरी दावा नं.१६/२०२४ चा दावा दाखल झालेची कोणतीही माहिती नसलेने अर्जदार यांना त्याकामी हजर राहता आले नाही.

21.1.26
Superintendent
Civil C... Sr. Dn.

५. मुळ समरी दावा नं.१६/२०२४ मध्ये झालेल्या हुकूमनामाची अंमलबजावणी करणेकरीता वि.प. यांनी रेग्यु.दर.नं. ४६/२०२५ ची दाखल केली व त्याची नोटीस अर्जदार यांना ता. ०२/०१/२०२६ इ. आलेनंतर समजुन आले.

६. अर्जदार हे समरी दिवाणी नं.१६/२०२४ चे कामी जाणुनबुजुन गैरहजर राहिले असे झाले नाही. वर नमुद कारणामुळे अर्जदार हे समरी दि.के.नं. १६/२०४ चे कामी हजर नसताना अर्जदार यांचे विरुध्द एकतर्फा आदेश होऊन ता.१४/०७/२०२५ इ.रोजी हुकूमनामा झालेला आहे. वास्तविक अर्जदार हे वि.प. यांनी समरी दि.दावा नं.१६/२०२४ मध्ये नमुद केलेली रक्कम कधीही कायदेशीर देणी लागत नव्हते व नाही. वि.प. यांनी चूकीची, खोटी व बेकायदेशीर रक्कमेची मागणी केली असलेने अर्जदार यांना कोणत्याही परिस्थितीत मान्य व कबुल नाही. समरी दावेमध्ये कोणताही लेखी मान्य केलेचा पुरावा, हुंडी, चेक नसलेने व केवळ बनावट व खोटे खाते उतारा, बिल व इतर कागदपत्रांवरुन फसवुन दावा एकतर्फा डिसाईड करुन घेतला आहे. अर्जदार यांना दावेत हजर होऊन लिव्ह टू डिफेंडचा अर्ज देता आला नसलेने खरी वस्तुस्थिती मा.कोर्टाचेसमोर आलेली नाही. तसेच वि.प. यांनी चुकीच्या नावावर व चूकीच्या फर्मवर दावा दाखल केलेला होता. अशास्थितीत सदरचा समरी दावेमध्ये अर्जदारांना हजर होऊन लिव्ह टू डिफेंडचा अर्ज देणेची संधी मिळाली असती तर अर्जदार यांना त्याकामी यशाची पूर्ण खात्री होती व आहे.अशास्थितीत समरी दावा ता.०१/०६/२०२४ इ.मध्ये एकतर्फा झालेला हुकूमनामा रद्द होवुन अर्जदार यांना हजर होऊन लिव्ह टू डिफेंड देणेची संधी मिळालेस वि.प. यांचे काहीही नुकसान होणार नाही. उलट न्यायादानास मदत होणार आहे व अर्जदारास त्याची बाजू मांडणेस संधी मिळणार आहे. मात्र संधी न मिळालेस अर्जदार यांचे कशानेही न भरुन येणारे नुकसान होणार आहे. त्यामुळे मुळ समरी दिवाणी दावा क्रं.१६/२०२४ मध्ये एकतर्फा झालेला

21.1.26
Superintendent
Civil Court Sr. Dn.
Ichalkaranji

हुकूमनामाा रद्द करणेत यावा म्हणुन सदरचा अर्ज अर्जदार यांना दाखल करणे भाग पडले आहे.

७. समरी दिवाणी दावा क्रं.१६/२०२४ चा एकतर्फा निकाल ता.१४/०७/२०२५ इ. झाला असलेचे अर्जदार यांना रेग्यु. दर. नं.४६/२०२५ ची नोटीस ता.०२/०१/२०२६ इ.लागु झालेनंतर समजले आहे. दिवाणी प्रक्रिया संहिता ऑर्डर ३७ रुल ३ प्रमाणे दावेत हजर होण्याबाबत तरतुद केलेली आहे. तसेच विशिष्ट परिस्थितीत प्रतिवादीस हजर होण्यास अथवा बचावाची परवानगी मागणेस विलंब झालेस तो न्यायाचे हेतुस्तव माफ करणेबाबत तरतुद आहे. तसेच ऑर्डर ३७ रुल ४ प्रमाणे मे.कोर्टांना एकतर्फा निकाली झालेल्या दावेमध्ये पुन्हा प्रतिवादीस दावेत हजर होऊन बचावास परवानगी मागणेची तरतुद आहे. तसेच मे.कोर्टांना झालेल्या निकालाच्या आधारे दाखल झालेली दरखास्त तहकुब ठेवणेबाबत अधिकार आहे.

८. यातील अर्जदार यांचा प्रस्तुतचा अर्ज मंजुर होऊन त्यांचे विरुध्द झालेला एकतर्फा आदेश रद्द होऊन मुळ समरी दावेत बचावाची परवानगी मिळणेकरीता ऑर्डर ३७ रुल ४ प्रमाणे अर्जदार यांन समरी दिवाणी केस नं.१६/२०२४ चे कामी हजर होणेस परवानगी मिळुन त्यानंतर सदर कामी बचावास परवानगी मागणेस संधी देणेस व मुळ दावा गुणदोषावर निकाली होणे नैसर्गिक न्यायतत्वानुसार न्यायोचित आहे.

९. प्रस्तुत अर्ज दाखल करणेस मुदतीचा कायदा आर्टीकल १३७ लागु होत असलेने प्रस्तुत अर्जास कोणताही विलंब झालेला नाही. मुदतीचा कायदा आर्टीकल १३७ प्रमाणे हुकूमनामा झालेपासुन ३ वर्षाच्या आत दाखल करणे आवश्यक आहे. त्याप्रमाणे सदरचा अर्ज हा हुकूमनामा ता.१४/०७/२०२५ या तारखेपासुन ३ वर्षाचे आत असलेने सदर अर्जास मुदतीच्या कायद्याची बाधा येत नाही. त्यामुळे सदरचा अर्ज हा मुदतीत दाखल केलेला आहे.

21.1.26
Superintendent
Civil Court Sr. Dn.
Ichalkaranji

१०. सदर अर्जास योग्य तो कोर्ट फी स्टॅम्प जोडला आहे.

११. <u>ज्युरीसडिक्शन</u> - मुळ समरी दिवाणी दावा क्रं.१६/२०२४ चा दावा मा.कोर्टांनी मंजुर केला असलेने सदरचा अर्ज दाखल करुन घेऊन त्यावर निकाल देणेचा अधिकार मा.कोर्टांना आहे.

१२. **सबब विंनती अशी की,**

अ. समरी दिवाणी दावा क्रं.१६/२०२४ चे कामी झालेला एकतर्फा निकाल रद्द होऊन अर्जदार यांना दावेत हजर होणेकरीता व दावेमध्ये बचावाची परवानगी मिळणेकरीता अर्ज दाखल करणेस परवानगी मिळावी व सदरचा दावा पुन्हा फैलावर घेणेत यावा.

ब. जरुर तर अर्ज दुरुस्त करु. तरी तशी परवानगी असावी.

क. योग्य ती दाद व न्यायाचे सर्व हुकूम याच कामी व्हावेत.

ड. सोबत दिले विलंब माफीचा व स्टे चा अर्ज मंजुर व्हावा.

---------

येणेप्रमाणे असे. सोबत वकीलपत्र, कागद हजर केलेची यादीव त्याप्रमाणे कागदपत्रे, अर्जदारांचा पत्ता मेमो इ. कागद हजर केले आहेत.

ता. ५ /०१/२०२६

**Rohitkumar And Company**
Prop.Karwa Jagdishprasad Jugalkishore(HUF)

-----------Proprietor / Karta

## प्रतिज्ञा

मी यातील अर्जदार (मुळ प्रतिवादी) रोहीतकुमार ॲण्ड कंपनी तर्फे प्रोप्रा. श्री. जगदीशप्रसाद जुगलकिशोर करवा, (HUF) व.व.५६, धंदा - व्यापार, रा. इचलकरंजी अशी

21.1.26
Superintendent
Civil Court Sr. Dn.
Ichalkaranji

प्रतिज्ञा करतो की, वरील अर्जातील संपुर्ण मजकुर माझे माहितीप्रमाणे व समजुतीप्रमाणे खरा व बरोबर आहे. म्हणुन केली प्रतिज्ञा सही ता. २१ /०१/२०२६

**Rohitkumar And Company**
Prop.Karwa Jagdishprasad Jugalkishore(HUF)

Proprietor / Karta

## ॲफिडेव्हिट

देवाची शपथ घेऊन खरे सांगतो की माझे नांव श्री. जगदीशप्रसाद जुगलकिशोर करवा, व.व.५६, धंदा - व्यापार, इचलकरंजी सत्यप्रतिज्ञेवर ॲफिडेव्हिट करतो की,

मी आजरोजी माझेविरुध्द झालेला एकतर्फा हुकूमनामा रद्द व्हावा म्हणुन अर्ज दिला आहे. त्या अर्जातील संपुर्ण मजकुर माझे माहितीप्रमाणे व समजुतीप्रमाणे खरा व बरोबर आहे. म्हणुन केले ॲफिडेव्हिट सही ता. २१ /०१/२०२६

**Rohitkumar And Company**
Prop.Karwa Jagdishprasad Jugalkishore(HUF)

Proprietor / Karta

मी ॲफिडेव्हिट करणार
यांना ओळखतो.

**अशोक घ.अग्रवाल, ॲडव्होकेट**

## प्रतिज्ञा

मी यातील ॲफिडेव्हिट करणार अशी प्रतिज्ञा करतो की, वरील ॲफिडेव्हिटमधील संपुर्ण मजकुर माझे माहितीप्रमाणे व समजुतीप्रमाणे खरा व बरोबर आहे. म्हणुन केली प्रतिज्ञा सही ता. २१ /०१/२०२६

**Rohitkumar And Company**
Prop.Karwa Jagdishprasad Jugalkishore(HUF)

Proprietor / Karta

Solemnly Affirmed before me by
Shri. Jagdishprasad Jugalkishor Karwa
of Ichalkaranji ......who is
identified by Shri... Adv. A. G. Agrawal
............whom I know personally
Dated :- 21.1.2026

Superintendent
Civil Court Sr. Dn.
Ichalkaranji